.nagpur

# NMC e NEWS LETTER

एप्रिल २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/



# महापालिकेचे सर्व झोन 'झिरो पेंडन्सी' करा : मुख्यमंत्री

## सतरंजीपुरा झोनच्या नवनिर्मित कार्यालयाचे उद्घाटन




नागपूर महानगरपालिकेच्या सर्व झोन कार्यालयाचे कामकाज हे 'झिरो पेंडन्सी' करा. ज्या दिवशी फाईल कार्यालयात येईल, त्या दिवशी त्या फाईलचा निपटारा करण्यात यावा, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रविवार (ता.२९) महापालिकेच्या सतरंजीपुरा झोन कार्यालयाच्या नवनिर्मित इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, राज्यसभेचे खासदार डॉ.विकास महात्मे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास कुंभारे, आमदार डॉ.मिलिंद माने, आमदार सुधाकर कोहळे, आमदार सुधाकर देशमुख, आमदार गिरिश व्यास, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती विरेंद्र कुकरेजा, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, झोन सभापती यशश्री नंदनवार, ज्येष्ठ नगरसेविका आभा पांडे, नगरसेवक प्रवीण भिसीकर, नगरसेवक संजय चावरे, कर व कर आकारणी समिती सभापती संदीप जाधव, संजय महाजन, नितीन साठवणे, अभिरूची राजगिरे, शकुंतला पारवे, डॉ.ज्योती भिसीकर प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी माझ्या मंत्रालयात झिरो पेंडन्सी प्रणाली राबविली आहे. एक कोटीपेक्षा जास्त फाईल्सचा निपटारा करण्यात आलेला आहे. ज्या दिवशी फाईल दाखल होते, त्याच दिवशी त्या फाईलचा निपटारा करण्याच्या सूचना त्यांनी महापौर नंदा जिचकार यांना केल्या. त्यासंदर्भातील विभागीय आयुक्त दळवी यांचे महापालिकेत झिरो पेंडन्सी या विषयावर कार्यशाळा घेण्याचे महापौर आणि आयुक्त यांनी सूचित केले. सतरंजीपुरा झोनच्या नवी इमारत उभारणीसाठी त्यांनी महापालिकेचे अभिनंदन केले. मी महापौर असताना नितीनजी बांधकाम मंत्री होते. त्यावेळी महापालिकेचे कामकाज केंद्रीय पद्धतीने केले जात असत. त्यावेळी मी आणि नितिनजींनी कामकाजाची विकेंद्रीपद्धती लागू करत महापालिकेचे कामकाज झोन पद्धतीने सुरू केले होते. तत्कालिन नगरसेवक व विद्यमान आमदार कृष्णा खोपडे यांनी पुढाकार घेऊन सतरंजीपुरा येथे झोन कार्यालय व्हावे, ही मागणी रेटून धरली होती. आज सतरंजीपुरा झोनची सुसज्ज इमारत उभी आहे. येथे येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांचे समाधान नक्कीच होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत महापौर नंदा जिचकार आणि सभापती यशश्री नंदनवार यांनी केले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी फलकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक झोन सभापती यशश्री नंदनवार यांनी केले. कार्यकारी अभियंता राजेश भूतकर आणि कंत्राटदार संजय मेडपल्लीवार यांचे स्वागत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. माजी ज्येष्ठ नगरसेवक विठू महाजन यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले. कार्यक्रमाला स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती सभापती संजय बंगाले, विधी समिती सभापती धर्मपाल मेश्राम, वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, लकडगंज झोन सभापती दीपक वाडीभस्मे, गांधीबाग झोन सभापती वंदना यंगटवार, मनपातील प्रतोद दिव्या धुरडे, श्रद्धा पाठक, मनिषा अतकरे, नगरसेवक रमेश पुणेकर, राजकुमार शाहू, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, मुख्य अभियंता मनोज तालेवार उपस्थित होते.

# बाबासाहेबांच्या संविधानाने दिला जगण्याचा हक्क : सत्यपाल महाराज




## मनपा-अधिकारी कर्मचारी यांचे संयुक्त आयोजन

बाबासाहेबांमुळे मी बोलू शकतो. महिला खुर्चीत बसू शकतात. बाबासाहेबांमुळेच आज महिला नगरसेविका झाल्या. महापौरपदाचा मान मिळाला. राष्ट्रपतीपदावर महिला आरूढ झाली. चपला शिवणाऱ्याची मुलगी न्यायधीश झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाने ही किमया केली. प्रत्येकाला समान जगण्याचा अधिकार दिला, या शब्दात सप्तखंजेरी वादक प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचे गोडवे गायले.निमित्त होते नागपूर महानगरपालिका आणि अधिकारी,कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिबा फुले जयंती समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे. नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील हिरवळीवर सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. यावेळी आमदार मिलिंद माने, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती विरेंद्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, बसपा पक्षनेते मोहम्मद जमाल, शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, विधी समितीचे सभापती ड. धर्मपाल मेश्राम, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती नागेश सहारे, दुर्बल घटक समितीचे सभापती महेंद्र धनविजय, माजी स्थायी समिती सभापती संदीप जाधव, आसीनगर झोनच्या सभापती वंदना चांदेकर उपस्थित होते.

# शहरातील सर्व ॲथेलेटिक्स ट्रॅक मनपा दुरूस्त करणार

## क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांचा पुढाकार

नागपूर महानगरपालिकेद्वारे रेशींमबाग मैदान येथील ॲथेलेटिक्स ट्रॅकची दुरूस्ती करण्यात आली आहे. नागपुरातील सर्व ॲथेलेटिक्स ट्रॅक दुरूस्त करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा समिती नागेश सहारे यांनी दिली. रेशींमबाग मैदानातील ॲथेलेटिक्स ट्रॅक खराब झाला होता. त्यामुळे तेथील खेळाडूंना सराव करण्यास त्रास जात होता. तो ट्रॅक दुरूस्त करण्यात यावा, अशी मागणी तेथील खेळाडू सातत्याने करत होते. क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी पुढाकार घेऊन प्रत्यक्ष ठिकाणची शुक्रवार (ता.२७) ला पाहणी केली. त्याप्रसंगी त्यांच्यासमवेत जलप्रदाय समिती सभापती पिंटू झलके प्रामुख्याने उपस्थित होते.रेशींमबाग येथील ॲथेलेटिक्स ट्रॅकवरून सराव करत आतापर्यंत अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार झाले आहे. यामध्ये शरद आणि शेखर सूर्यवंशी, रोहिणी आणि मोनिका राऊत, माधुरी गुरनुले, विजया सोनवणे, कल्पना बांते, वसुधा मोरे यांचा समावेश आहे. रेशींमबाग मैदानावर एँथोनी सर, रवी टोळ, मंगेश पौनीकर यांचे ॲथेलेटिक्सचे प्रशिक्षण केंद्र चालतात. याशिवाय पोलिस विभागातील विद्यार्थी, महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचे खेळाडू या ट्रॅकवर सराव करत असतात. ट्रॅकच्या नवनिर्माणामुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे.मनपाच्या पुढाकाराने शहरात आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेचा क्रीडा विभाग व समिती सदैव कटीबद्ध असते. शहरातील सर्व ॲथेलेटिक्स ट्रॅक नव्याने तयार करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी बोलताना केली.यावेळी संजू घुमारे, रितेश वैद्य, सोफी शेख, निशांत देहारिया, अनिकेत रामेकर, प्रफुल्ल कोहाड, राहूल कानतोडे प्रामुख्याने उपस्थित होते.




# नागपूर होईल देशातील उत्तम पाणीपुरवठ्याचे शहर : देवेंद्र फडणवीस

## चंद्र नगर येथील पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने पाणीपुरवठ्याची उत्तम योजना नागपुरात साकारत आहे. चंद्र नगर येथील पाण्याची टाकी हा त्याचाच एक भाग आहे. टप्प्याटप्प्याने या टाक्या झाल्या की नागपूर हे देशातील २४ तास पाणीपुरवठा करणारे सर्वोत्तम शहर असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत नागपूर महानगर पालिकेच्या वतीने चंद्रनगर येथे बांधण्यात आलेल्या पाणी टाकीचे लोकार्पण करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, आमदार सुधाकर कोहळे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, धंतोली झोन सभापती विशाखा बांते, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, नगरसेविका भारती बुंदे, रिपाइं (आठवले) चे भूपेश थूलकर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, चंद्रनगर परिसरात पाणी सर्वांना हवे होते मात्र जागेचा प्रश्न होता. आता या टाकीमुळे पुढील ३० वर्षे या परिसराल मुबलक पाणी मिळेल. आमदार सुधाकर कोहळे यांनी प्रास्ताविकातून दक्षिण नागपूर मतदार संघातील विकासकामांची माहिती दिली. प्रभाग ३३ मधील नागरसेवकांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांचे स्वागत केले. ततपूर्वी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांनी पाणी टाकीचे लोकार्पण केले.संचालन व आभार प्रदर्शन जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके यांनी केले.

# पालकमंत्र्यांनी घेतला हुडकेश्वर- नरसाळा येथील विकासकामांचा आढावा



पुढील मार्चपर्यंत विकासकामे पूर्ण करण्याचे निर्देश

हुडकेश्वर-नरसाळा येथील विकासकामाला शासनाने मंजुरी दिली आहे. तेथे आतापर्यंत महानगरपालिकेने केलेल्या कामाचा आढावा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील सभागृहात आयोजित बैठकीत घेतला.यावेळी स्थायी समिती सभापती विरेंद्र कुकरेजा, आयुक्त अश्विन मुदगल, हनुमाननगर झोन सभापती भगवान मेंढे, नगरसेविका स्वाती आखतकर, विद्या मडावी, लिला हाथीबेड, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, तांत्रिक सल्लागार विजय बनगीरवार, शहर अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी.जांभूळकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजीव जयस्वाल, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) अनिरूद्ध चौगंजकर, आरोग्य अधिकारी (दवाखाना) डॉ. अनिल चिव्हाने, नगररचना विभागाचे सहायक संचालक प्रमोद गावंडे, कार्यकारी अभियंता प्रदीप राजगिरे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना पालकमंत्र्यांनी मौजा हुडकेश्वर – नरसाळा येथे प्रशासनाने केलेल्या विकासकामाची माहिती आयुक्तांमार्फत जाणून घेतली. मौजा हुडकेश्वर आणि नरसाळा महानगरपालिका क्षेत्रात नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरिकांच्या सोयी सुविधांच्या विकासकामात विविध ठिकाणी शासनाद्वारे निधी प्राप्त झाला असल्याची माहिती आयुक्त अश्विन मुदगल यांनी दिली. ताजेश्वर नगर येथील पाणी टाकी सुरू करण्याबाबत पालकमंत्र्यानी विचारले असता पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झाले असून त्याठिकाणी फीडर लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. हुडकेश्वर व नरसाळा येथील अंतर्गत ३५ किमी लांबीच्या रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले असून त्याचा दर्जा ही उत्तम असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. यावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाधान व्यक्त केले.

## थोडक्यात...

### मनोज चापले यांनी केली फ्रेण्डस् कॉलनी येथील नाल्याची आकस्मिक पाहणी

नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले यांनी सोमवारी फ्रेण्डस् कॉलनी येथील नाल्याची आकस्मिक पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत धरमपेठ झोन सहायक आयुक्त महेश मोरोणे उपस्थित होते.

पावसाळ्यापूर्वी शहरातील संपूर्ण नाल्यांची सफाई व्हावी यासाठी वेळोवेळी नाला साफ करण्याचे निर्देश दिले असताना देखिल अद्याप नाला स्वच्छ केला नाही म्हणून सभापती मनोज चापले यांनी नाराजी व्यक्त केली. नाला साफ न केल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाल्याने तेथील नागरिक त्रस्त झाले आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार धरमपेठ झोनमध्ये तक्रार केली असता, अद्याप नाल्याच्या सफाईचे काम न झाल्याने सभापती मनोज चापले यांनी संताप व्यक्त करत अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. पावसाळ्यापूर्वी नाला साफ करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यावेळी त्यांच्यासमवेत राजेश हाथीबेड आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### ७ मे पासून नदी स्वच्छता अभियान राबविणार

नागनदी, पिवळीनदी, पोरानदी संपूर्ण स्वच्छ करण्याचा मनपाचा निर्धार

नागपूर महानगरपालिकेतर्फे ७ मे ते २० जुन या दरम्यान नदी स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यांअंतर्गत शहरातील नागनदी, पिवळी नदी, पोरा नदी या तिन्ही नद्या संपूर्णपणे स्वच्छ करण्याचा मनपाचा निर्धार आहे. यासंदर्भातील पूर्व तयारीचा आढावा महापौर नंदा जिचकार यांनी गुरुवारी (ता.२६) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित बैठकीत घेतला. यावेळी स्थायी समिती सभापती विक्की कुकरेजा, सत्तापक्ष नेता संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त राजेश मोहिते, तांत्रिक सल्लागार विजय बनगिरवार, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी मागील वर्षी केलेल्या कामाचा आढावा महापौरांनी अधिका-यांमार्फत घेतला. मागील वर्षी तिन्ही नदी मिळून जवळपास ७२ हजार टन गाळ नदीतून काढण्यात आला होता. यावर्षीही गाळ व माती काढण्याचे काम करावयाचे आहे. शहरात तीन नद्या वाहत आहे. नागनदीची लांबी १८ किमी, पिवळी नदीची १७.५० किमी, पोरा नदीची लांबी १२ किमी आहे. यामध्ये १८ टप्प्यांमध्ये कामाची आखणी केली असल्याची माहिती अधीक्षक अभियंता मनोज तालेवार यांनी दिली.मागील वर्षी राहिलेला भाग या वर्षी सुटता कामा नये. त्याठिकाणचा गाळ व माती काढण्यात यावी, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. या कामासाठी आवश्यक त्या स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात यावी, अशा सूचना महापौरांनी केल्या.मागील वर्षी नासुप्र, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, पटबंधारे विभाग, कंत्राटदार असोसिएशन यांच्या मार्फत उपकरणे मागविली होती. यावर्षीदेखील त्यांच्याकडून उपकरणे मागवून घेण्यात यावी, असे निर्देश आयुक्त अश्विन मुदगल यांनी दिले.

### नगरसेवकांनी जाणून घेतले पाणी पाणीपुरवठ्याचे तंत्र

कन्हान पंपिंग स्टेशन आणि जलशुद्धीकरण केंद्राचा पाहणी दौरा



भर उन्हाळ्यात पाण्याची सर्वत्र टंचाई जाणवते. नागपूर शहराला कमी-अधिक प्रमाणात ती जाणवत असली तरी मुबलक पाणीपुरवठा करण्यात येतो. ह्या पाणी पुरवठ्याचे तंत्र काय, ते नागपूरकरांपर्यंत पोहचताना काय अडचणी येतात, पाण्याची सद्यस्थिती काय, बचतीचे महत्त्व काय, हे जाणून घेण्यासाठी उपमहापौर दीपराज पार्डीकर, जलप्रदाय समितीचे सभापती विजय झलके, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे आणि मनपातील उपनेते बाल्या बोरकर यांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय नगरसेवकांनी कन्हान पंपिंग स्टेशन आणि जलशुद्धीकरण केंद्राचा दौरा केला.सदर दौऱ्यात नागपूर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, एनईएसएलचे महाव्यवस्थापक डी.पी. चिटणीस, ओसीडब्ल्यूचे संचालक के.एम.पी. सिंग, जलशुद्धीकरण केंद्राचे प्रमुख प्रवीण सरण, ओसीडब्ल्यूचे जनसंपर्क विभाग प्रमुख सचिन द्रवेकर यांनी उपस्थित सर्व नगरसेवकांना पाणीपुरवठ्याचे आणि जलशुद्धीकरणाचे तंत्र समजावून सांगितले. नागपूर शहराला दररोज ६४० एमएलडी पाणीपुरवठा होतो. त्यापैकी २७० एमएलडी पाण्यापासून मनपाला मोबदला मिळत नाही. १८० प्रति व्यक्ती प्रति दिवस नागपूरकरांना पाणी मिळते. जगभरातील इतर शहरांच्या तुलनेत हा आकडा उत्तम आहे. सध्या २४ बाय ७ ही प्रकल्प प्रगतीपथावर असून यासाठी ६४ कमांड एरिया निश्चित करण्यात आले आहे. यापैकी १६ कमांड एरियात २४ बाय ७ ही योजना सुरू झाली असून अन्य ठिकाणचे कार्यही प्रगतीपथावर आहे. डिसेंबर २०१८ पर्यंत या योजनेचे ६० टक्के कार्य पूर्ण होईल, अशी माहिती कार्यकारी अभियंता संजय गायकवाड यांनी यावेळी दिली. सध्या कन्हान नदी आणि पेंच जलाशयात मुबलक पाणीसाठा असून उन्हाळ्यात पाणीपुरवठ्यामध्ये कुठलीही अडचणी येणार नाही, अशी माहितीही श्री. गायकवाड यांनी दिली. याप्रसंगी बोलताना जलप्रदाय समितीचे सभापती विजय झलके म्हणाले, नागपूर महानगरपालिका नागपूर शहराला शुद्ध आणि मुबलक पाणी पुरवठा कशाप्रकारे करते, हे जाणून घेण्यासाठी नगरसेवकांच्या या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर शहरवासीयांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी नागपूर महानगरपालिका कटिबद्ध आहे. असे असले तरी पाणी बचत ही काळाची गरज आहे. गरज असेल तेवढेच पाणी वापरावे, याबाबत जनजागृती करण्यासाठी नगरसेवकांची भूमिका महत्त्वाची आहे. यासाठी सर्व नगरसेवकांचे सहकार्य अपेक्षित आहे. नगरसेवकांनी याबाबत आपल्या प्रभागात जनजागृती मोहीम होती घेण्याचे आवाहन सभापती विजय झलके यांनी यावेळी केली. तत्पूर्वी सर्व नगरसेवकांनी कन्हान पंपिंग स्टेशनची पाहणी करून पाणी पुरवठ्याविषयी माहिती घेतली. त्यानंतर जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली. नगरसेवकांच्या शंकांचे निरसन मनपा आणि ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी केले. यानंतर ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून नागपूर शहर पाणीपुरवठा योजनेसंदर्भातील माहिती दिली.

### केळीबाग मार्गाची मनपा आयुक्तांनी केली पाहणी

अतिक्रमण हटविण्यास सुरुवात :
सर्व विभागांशी समन्वय साधून कारवाई करण्याच्या सूचना

सर्वोच्च न्यायालयाने महाल भागातील केळीबाग मार्गाच्या रुंदीकरणाला हिरवी झेंडी दिल्यानंतर महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. रस्ता रुंदीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर करण्याची प्रक्रिया मंगळवार (ता. २४) पासून सुरू झाली. या संपूर्ण रस्त्याची पाहणी मनपा आयुक्त अश्विन मुदगल यांनी आज केली.यावेळी त्यांच्यासोबत माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, गांधीबाग झोन सभापती वंदना यंगटवार, नगरसेवक राजेश घोडपागे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, गांधीबाग झोनचे सहायक आयुक्त अशोक पाटील होते. मनपा झोन कार्यालयालगत असलेली मनपाच्याच मालकीची एक इमारत पाडून रस्ता रुंदीकरण मार्गातील अडथळे दूर करण्याच्या कार्यवाहीला सुरूवात करण्यात आली. यानंतर आयुक्तांनी संपूर्ण केळीबाग रस्त्याची पाहणी केली. अतिक्रमण विभागाने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी घेतली. यावेळी माजी महापौर व प्रभागाचे नगरसेवक प्रवीण दटके यांनी त्यांनी रस्त्यावरील अतिक्रमण व इतर सर्व इमारतीसंदर्भात माहिती दिली. अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करीत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग, एसएनडीएल, ओसीडब्ल्यू व तत्सम विभागांशी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे निर्देश आयुक्त अश्विन मुदगल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. रुंदीकरण होत असलेल्या केळीबाग मार्गाच्या सीमेंटीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. आयुक्तांच्या या दौऱ्यात परिसरातील व्यापारी व नागरिकही सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी काही व्यापारी व नागरिकांशीही चर्चा केली.

### २९ एप्रिल रोजी होणार पट्टे वाटप : कुकरेजा

उत्तर नागपुरात कार्यक्रम : फडणवीस, गडकरी यांची उपस्थिती

शहरातील झोपडपट्टीवासीयांना मालकी हक्काचे पट्टे वाटपाचा कार्यक्रम २९ एप्रिल रोजी उत्तर नागपुरातील मार्टिन चर्च परिसर येथे आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्यात येईल, अशी माहिती मनपाच्या स्थायी समितीचे सभापती विरेंद्र कुकरेजा यांनी दिली.यासंदर्भात आढावा घेण्यासाठी सोमवारी (ता. २३) स्थायी समिती सभापतींच्या कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार सुधाकर कोहळे, आ. डॉ. मिलिंद माने, स्थायी समितीचे सभापती विरेंद्र कुकरेजा, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, नासुप्रचे विशेष कार्य अधिकारी अजय रामटेके, एनएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त सुधाकर कुळमेथे, मनपाचे कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभूळकर उपस्थित होते. सदर बैठकीत कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. मालकी हक्क पट्टे वाटपासंदर्भातील संपूर्ण माहिती सभापती विरेंद्र कुकरेजा यांनी घेतली. आमदारद्वयांनीही याबाबत आढावा घेतला. इंदिरा नगर, कस्तुरबा नगर येथील रहिवाशांना मुख्यत्वेकरून या कार्यक्रमात मालकी हक्काचे पट्टे देण्यात येईल. सदर कार्यक्रमाला शहरातील खासदार, आमदार, महापौर व नागपूर महानगरपालिकेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# महापौरांनी जाणून घेतल्या नगरसेवकांच्या पाणी समस्या

ओसीडब्ल्यूच्या कामाबाबत तीव्र नाराजी



पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे. नागरिकांना दूषित पाणी मिळत असल्याने नागरिक वारंवार तक्रार करीत आहे. असे असूनदेखिल ओसीडब्ल्यूने समस्या न सोडविल्याने महापौर नंदा जिचकार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या निर्णयानुसार जलप्रदाय समितीच्या झोननिहाय बैठकीअंतर्गत बुधवारी (ता.२५) सतरंजीपुरा झोन कार्यालय येथे नगरसेवकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्तर नागपूरचे आमदार डॉ. मिलिंद माने, उपमहापौर दीपराज पार्डीकर, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, उपसभापती श्रद्धा पाठक, नवनिर्वाचित झोन सभापती यशश्री नंदनवार, माजी सभापती संजय चावरे, नगरसेविका आभा पांडे, अभिरूची राजगिरे, शकुंतला पारवे, विरंका भिवगडे, नगरसेवक संजय महाजन, रमेश पुणेकर, शेषराव गोतमारे, नितीन साठवणे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महापौरांनी झोनमधील प्रभागांचा आढावा घेतला. झोनमध्ये नियमित टँकर येत नाही. सकाळी टँकरची मागणी केल्यानंतर रात्री टँकर येतो यामुळे स्थानिक नागरिकांना त्याचा त्रास होत असल्याने नागरिक नगरसेवकांकडे तक्रार करीत आहे, अशा तक्रारी नगरसेवकांनी महापौरांसमोर मांडल्या. यावर महापौरांनी ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांना खडसावून त्यांना नागरिकांच्या पाण्याच्या समस्या सोडविण्यात याव्या आणि नगरसेवकांच्या सूचनेनुसार नियमित पाणी पुरवठा करण्याचे निर्देश दिले. गढूळ पाण्याच्या समस्येबाबतही नगरसेवकांनी तक्रार केली. पाण्याचे नमुने सभापती संजय चावरे यांनी बैठकीत आणून महापौरांना दाखविले. यावर महापौर नंदा जिचकार यांनी संताप व्यक्त करत १५ दिवसाच्या आत झोनमधील सर्व समस्या सोडविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. यानंतरही कामे झाली नाही तर ओसीडब्ल्यूवर दंड आकारण्यात येईल, असे आश्वासन महापौरांनी नगरसेवकांना दिले. यासाठी सातत्याने स्थानिक नगरसेवकांसोबत समन्वय साधावा, अशा सूचना केल्या. पावसाळा सुरू होण्यापूर्वी झोनमधील सर्व विहिरी स्वच्छ करण्यात याव्यात, त्यातील गाळ काढून त्याठिकाणी नेटवर्क तयार करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. यावेळी जर ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांकडून कामे झाली नाही तर त्याची तक्रार माझ्याकडे करावी, मी ती तक्रार २४ तासाच्या आत सोडवेन, असे आश्वासन जलप्रदाय समिती सभापती पिंटू झलके यांनी दिले. सतरंजीपुरा झोनचा काही भाग लकडगंज झोन व आसीनगर झोनमध्ये समाविष्ट केला आहे. टँकरची मागणी केली असता काही भागात लकडगंज व आसीनगर झोनमधून पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे टँकर येण्यास उशीर होतो, त्यामुळे जो भाग जवळ असेल त्या ठिकाणांवरून पाणी पुरवठा करण्यात यावा आणि टँकरची संख्यासुद्धा वाढवण्यात यावी, असे निर्देश सभापती पिंटू झलके यांनी दिले. यावेळी उत्तर नागपूरचे आमदार डॉ. मिलिंद माने बोलताना म्हणाले, पिण्याचे पाणी मिळणे हा नागरिकांचा मुलभूत अधिकार आहे. त्याचे हनन होता कामा नये. ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी आणि स्थानिक नगरसेवकांनी समन्वय साधून झोनमधील समस्या तातडीने सोडव्यावात. दूषित पाण्यासारखा गंभीर प्रश्न झोनमध्ये आहे, त्यावर त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीला निगम सचिव हरिश दुबे, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, ओसीडब्ल्यूचे राजेश कालरा, प्रवीण शरण यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.